ADFACTORS PR
Knowledge-driven communications


| Published Date: | 11 Oct 2018 | Publication: | Apla Varthar (Marathi) |
| --- | --- | --- | --- |
| Edition: | Mumbai | Page No: | 12 |
| MAV/CCM: | 64548/53.79 | Circulation: | 15000 |


# आदित्य, करणने टीसीएस आयटी मंजुषा जिंकली

मुंबई, दि. १० - टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या अग्रगण्य आयटी सेवा, सल्लागार आणि व्यवसाय सोल्यूशन्स फर्मने आयोजित केलेल्या टीसीएस आयटी मंजुषा -२०१८ या भारतातील शालेय मुलांसाठीच्या सर्वांत मोठ्या तंत्रज्ञान प्रश्नमंजूषेत मुंबईतील ८५० हून अधिक शाळांनी सहभाग घेतला. ७ ऑक्टोबर रोजी इंडियन एज्युकेशन सोसायटी, माणिक सभागृह, लिलावती हॉस्पिटलसमोर, वांद्रे रीक्लेमेशन, मुंबई येथे ही स्पर्धा आयेजित करण्यात आली होती. मुंबई पर्वात नाशकातील विविध शाळांमधील २५ संघही सहभागी झाले होते.

८ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांमध्ये सक्षम करणाऱ्या तंत्रज्ञान कौशल्यांच्या वाढत्या महत्त्वाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने ही खडतर स्पर्धा वार्षिक ज्ञान स्पर्धेच्या रुपात चालवली जाते. प्रत्येक शाळा दोन-दोन विद्यार्थ्यांचे कितीही संघ यात पाठवू शकते. यासाठी प्रवेश फी नाही.

यंदाच्या टीसीएस आयटी मंजुषामध्ये टेक ट्रेंड्सचा समावेश होता. ॲनिमेशन सॉफ्टवेअरचा वापर करून गेमिफिकेशनच्या माध्यमातून सादर केलेल्या या टेक ट्रेंडसने प्रेक्षक आणि संघांना जागेवर खिळवून ठेवले. या स्पर्धेत ५ फेऱ्या होत्या. मास पर्सनलायझेशन, लेव्हरजिंग इकोसिस्टम्स, क्रीएटिंग एक्स्पोन्शिअल व्हॅल्यू आणि एम्ब्रेसिंग रिस्क. शिवाय ३२@५० यावर एक विशेष फेरी होती.

जगभरात प्रचंड परिणाम घडवू पाहणाऱ्या तंत्रज्ञानातील ट्रेंड्सवर या स्पर्धा व्यासपीठात भर देण्यात आला होता. लिखित प्राथमिक फेरीत निवडून आलेल्या पहिल्या ६ संघांना प्रादेशिक अंतिम फेरीत प्रवेश देण्यात आला होता.

प्रादेशिक अंतिम फेरीतील स्पर्धेच्या ५फेऱ्यांनंतर बॉम्बे स्कॉटिश स्कूल, पवई या शाळेतील आदित्य अग्रवाल आणि करण नागदेव यांनी विजेतेपद पटकावले. यंदाच्या प्रादेशिक विजेत्यांनी ६०,००० रुपयांचे गिफ्ट वाऊचर्स मिळवले. तर, डीएव्ही इंटरनॅशनल स्कूल, खारघर या शाळेतील अर्थ बी .चौहान व अंशुल सोलंकी या द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यांना ४०,००० रुपयांच्या गिफ्ट वाऊचर्सने सन्मानित करण्यात आले. शिवाय, विजेत्यांना खास डिझाइन करण्यात आलेल्या ट्रॉफी आणि मेडल देण्यात आले. अंतिम फेरीतील ६ स्पधर्कांना टीसीएसतर्फे अनेक बक्षिसे देण्यात आली. यात जीम बॅग, ब्ल्यू टूथ स्पीकर्ससह मल्टिफंक्शनल म्युझिक टॉर्च, वायरलेस आउटडोअर स्पीकर्स आणि टीसीएस५० पेन ड्राइव्ह यांचा समावेश होता. हे विजेते मुंबईचे प्रतिनिधीत्व करत भारतभरातील इतर ११ प्रादेशिक विजेत्यांसोबत राष्ट्रीय अंतिम फेरीत स्पर्धेत उतरतील.

टीसीएसचे मुख्य वित्त अधिकारी व्ही. रामकृष्णन यांच्या हस्ते बक्षिस वितरण पार पडले.

टीसीएस आयटी विझ २०१८ ही प्रश्नमंजूषा देशातील १२ ठिकाणी घेतली जाणार आहे - अहमदाबाद, बेंगळुरु, चेन्नई, हैदराबाद, कोलकाता, इंदोर, नागपूर, भुवनेश्वर, कोची, दिल्ली, मुंबई, आणि पुणे.

टीसीएस आयटी विझचे स्वरूपः टीसीएस बिझनेस ४.० फ्रेमवर्कवर आधारित ५ फेऱ्या असलेल्या अनोख्या फॉरमॅटमध्ये ही स्पर्धा घेतली जाते. यात ॲनिमेशनवर आधारित क्विझ सॉफ्टवेअर आहे. व्यावसायिक सर्किट बझरवर ही स्पर्धा आधारित असल्याने प्रत्येक संघाला उत्तर देण्यासाठी समान संधी उपलब्ध होते.

मास पर्सनलायझेशनः या फेरीत संघाला एकूण उत्तराचा गाभा सांगितला जातो आणि त्यांना त्यातून उरलेला चौथा भाग शोधायचा असतो. संघांना अतिरिक्त पर्यायही घेता येऊ शकतो. मात्र, त्यासाठी गूण कापले जातात.

लेव्हर्जिंग इको सिस्टम्सः या दृश्यात्मकतेवर आधारित फेरीत संघांना इतिहास आणि वर्तमान माहितीच्या आधारे संदर्भ शोधण्यास सांगितले जाते.

क्रीएटिंग एक्स्पोन्शिअल व्हॅल्यूः या बझर फेरीत, समोर असलेल्या सूचनांच्या किंवा क्ल्यूजच्या आधारे संघ विविध पॉईंट्सना जोडत एका समान मुद्द्यावर येण्याचा प्रयत्न करतात. अंतिम फेरीतील सर्व स्पधर्कांसाठी समान प्रश्न असतात. मात्र यात चुकीच्या उत्तरासाठी नकारात्मक गुण दिले जातात.